पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- 2024-2025

# सांस्कृतिक विभाग

प्राचार्य
डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख
प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर

सहाय्यक

डॉ. नितीन माळेगावकर

# श्री संत सावतामाळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## सांस्कृतिक विभाग

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष 2024 - 2025

**सांस्कृतिक विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2024 - 2025 मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.**

| |
|---|
| **जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम** |
| **व्याख्यान कार्यक्रम** |
| **केंद्रीय युवा महोत्सव सहभाग** |
| **मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव** |
| **वार्षिक स्नेहसंमेलन** |

### • जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम •

ज्या व्यक्तींनी समाज व देशासाठी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. अशा महान व्यक्तिमत्त्वांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त सांस्कृतिक विभागाच्या वतीने 21अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले. ज्यात

| अ.क्र | दिनांक | कार्यक्रम |
|---|---|---|
| 1 | 26/6/2024 | राजर्षी शाहू महाराज जयंती |
| 2 | 1/7/2024 | वसंतराव नाईक जयंती |
| 3 | 23/7/2024 | लोकमान्य टिळक जयंती |
| 4 | 01/08/204 | अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर पुण्यतिथी |
| 5 | 13/8/2024 | श्री रावसाहेब पाटील दांडगे पुण्यतिथी |
| 6 | 20/8/2024 | राजीव गांधी जयंती |
| 7 | 15/10/2024 | डॉ. ए पी जे अब्दुल कलाम जयंती |
| 8 | 17/10/2024 | महर्षी वाल्मिक जयंती |
| 9 | 3/1/2024 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती |
| 10 | 12/01/2024 | राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती |
| 11 | 23/1/2024 | नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती |
| 12 | 23/03/2024 | शहीद दिन |
| 13 | 11/04/2024 | महात्मा फुले जयंती |
| 14 | 14/04/2024 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती |

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

## सांस्कृतिक विभाग

## कार्यक्रमाची छायाचित्रे

- **जयंती व पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम**




राजर्षी शाहू महाराज जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. विजय पांडे




वसंतराव नाईक जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. संजीव कुमार पांचाळ





**लोकमान्य टिळक जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना  डॉ. महेश थोरात**





**अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर पुण्यतिथी प्रसंगी मार्गदर्शन करताना  डॉ. राजश्री पवार**





**श्री रावसाहेब पाटील दांडगे पुण्यतिथी प्रसंगी मार्गदर्शन करताना  डॉ. दिनेश कचकुरे**




**राजीव गांधी जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना  श्री. बाबासाहेब दाभाडे**




**डॉ. ए पी जे अब्दुल कलाम जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. महेश थोरात**



महर्षी वाल्मिक **जयंती**



सावित्रीबाई फुले जयंती



राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती



नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती



**भगतसिंग, शिवराम राजगुरू व सुखदेव थापर या शहिदांना शहीद दिनी अभिवादन करताना कर्मचारी**





महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याविषयी मार्गदर्शन करताना डॉ. नितीन माळेगावकर व उपस्थित प्राध्यापक

**महात्मा फुले जयंती**




**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती**

## • <u>व्याख्यान कार्यक्रम</u>•

➢ **श्री संत सावता महाराज पुण्यतिथी**:

दिनांक ३ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात सावता माळी महाराज यांच्या पुण्यतिथी व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून शिवछत्रपती महाविद्यालय, लासूर स्टेशन या महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख, प्रा. डॉ. नरसिंग कदम महाराज उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांची उपस्थिती होती. बोलत असताना डॉ. कदम म्हणाले की, वारकरी संप्रदायाने १२ व्या शतकात खरी अध्यात्मिक लोकशाही निर्माण केली. त्याकाळी समतेचा विचार घेऊन सांस्कृतिक गरज म्हणून विठ्ठल भक्तीचा प्रचार प्रसार केला. यावरून असे दिसते की, संतांनी भक्तीचा विचार डोळसपणे मांडला होता. व समाजाची उन्नती समोर ठेवूनच भक्ती करताना संत परंपरा दिसून येते. संतांच्या श्रद्धेत विवेक परिपूर्ण भरलेला आहे. तोच विवेक संत सावता महाराजांकडे होता. ज्या संतांच्या विचारात भ्रम नाही, त्या संताचा चांगला विचार चांगला समजावा. म्हणून संतत्व हे त्याच्या वृत्तीवरून ठरत असते. ईश्वराचं स्वरूप चराचरा मध्ये आहे. हे जाणणारा तो संत. कर्माच्या प्रत्येक कृतीत ईश्वर असतो हा महत्त्वाचा सिद्धांत सावता माळी यांनी मांडला. समाजामध्ये एकोपा, बांधिलकी आणि परस्पर असणारं प्रेम जोपसण्याचं काम केलं. समाजाच्या विस्कटलेल्या घडीला एकत्रित करण्याचं काम सावता माळी यांनी केले. तसेच संतांनी निसर्गाचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला आहे.

श्रम मुल्याचा, सामाजिक मूल्य, जैविक संवर्धनाचा सिद्धांत संत सावता माळी यांनी मांडला. कृती, संस्कार आणि श्रम यांच्या अधीन राहून काम केलं आहे. यावरून असे दिसते की, परिवर्तनाचं बिजरोपण संतांनी केलेलं आहे. तसेच समाजाला सम्यक कृती करण्याचं भान संतांनी दिलेले आहे. असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. प्रार्थना कु. भाग्यश्री शिंदे व शिवानी उबाळे यांनी म्हटली. सुविचार कु. आकांक्षा शेवाळे हिने म्हटला. पाहुण्यांचा परिचय कु. पूजा नाईक या विध्यार्थिनीने करून दिला. उपस्थित मान्यवरांचे आभार कु. साक्षी पोफळे या विध्यार्थिनीने मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पायल तावरे या विध्यार्थिनीने केले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रा. डॉ. राजश्री पवार, प्रा. डॉ. मंजुषा नळगीकर, प्रा. विजय पांडे, प्रा. डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. डॉ. दत्तात्रय येडले, प्रा. डॉ. सुरेश मुंढे, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. डॉ. अश्विन रांजणीकर, प्रा. डॉ. महेश थोरात, डॉ. संदीप जगताप, प्रा. डॉ. चंद्रनयन वाघमारे, प्रा. अरुण परदेशी, प्रा. श्रीमती, जया राजपूत, प्रा. श्रीमती, उज्ज्वला शिंदे, श्री दयानंद कांबळे, श्री प्रेम चव्हाण, श्री बाबासाहेब दाभाडे, श्री विनोद तुपे, श्री रत्नाकर जाधव, श्री रमेश जगधने, श्री जयराम जाधव, व विद्यार्थी व विध्यार्थिनी उपस्थित होत्या.

## ➢ साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती:

दिनांक 1 ऑगस्ट 2023 रोजी सांस्कृतिक विभाग आणि लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने फुलंब्री येथील अण्णाभाऊ साठे नगर बाजार गल्ली येथे "साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती" निमित्त गुणवंत सत्कार कार्यक्रम ग्रंथ प्रदर्शन व व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या कथा कादंबऱ्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. वस्तीतील लोकांनी व लहान बालकांनी अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेले ग्रंथ जवळून पाहिले. या कार्यक्रमाप्रसंगी वस्तीतील दहावी व बारावी पास झालेल्या आठ विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. त्यांना स्पर्धा परीक्षेची पुस्तके भेट म्हणून देण्यात आली. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्याविषयी लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रातील बालकांनी आपल्या भाषणांमधून मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील डॉ. नितीन माळेगावकर आणि प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्याविषयी तसेच लेखन साहित्य विषयी उपस्थित सर्व माता भगिनी व बालकांना मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमास वस्तीतील लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## ➢ विद्यापीठ नामविस्तार दिन:

दिनांक 14 जानेवारी 2024 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमीत्त व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. राहुल बचाटे (इतिहास विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर) हे लाभले होते. त्यांनी "लढा मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा: एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर अगदी सहजपणे होऊ शकले असते परंतु काही राजकीय नेत्यांच्या आपसातील मतभेदामुळे व चुकीच्या वक्तव्यामुळे विनाकारण संघर्षाची ठिणगी पेटली आणि नामांतराचा लढा हा हिंसक झाला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरानसारख्या जगविख्यात बुद्धिमान व्यक्तिमत्त्वाचं नाव देण्यासाठी विरोध व्हावा ही आपल्यासाठी अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. मराठवाड्यातील ठिकठिकाणी जिथे नामांतरासाठी मोठा संघर्ष झाला. त्याविषयी ऐतिहासिक संदर्भ देऊन या लढ्याचे सविस्तर विश्लेषण बचाटे सर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले तर अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस आर टकले यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. नितीन माळेगावकर
यांनी मांडले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## ➢ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती:

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित्त श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने दिनांक 14 एप्रिल 2024 रोजी परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवाद कार्यक्रमाची सुरुवात बौद्ध वंदनेने झाली ही बौद्ध वंदना श्री. दयानंद कांबळे यांनी म्हटली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नितीन माळेगावकर यांनी केले. परिसंवादाचे प्रमुख मार्गदर्शक होते प्रा. विलास बैले (सहाय्यक प्राध्यापक, समाजकार्य विभाग, कुंभोळकर महाविद्यालय वर्धा) त्यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांची प्रासंगिकता" या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटनेचे शिल्पकार आहेत त्यांना शिल्पकार म्हणून का संबोधले जाते किंवा घटना निर्मितीमध्ये त्यांचे काय योगदान होते याचा सगळयांनी अभ्यास केला पाहिजे व त्यांचे योगदान समाजातील लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजे.

सध्य परिस्थितीमध्ये माणूस हा अधिक जातीयवादी व धार्मिकवादी बनत चाललेला आहे. जे की बाबासाहेबांना मान्य नव्हते. बाबासाहेबांनी आपलं संपूर्ण आयुष्य समाजात मानवतावाद व सामाजिक समता रुजविण्यासाठी खर्च केले. परंतु आपण त्यांचे कार्य विसरु लागलो आहोत. बाबासाहेबांची जयंती नाचून साजरी करावी की वाचून साजरी करावी हे जाने त्याने ठरवले पाहिजे. त्यांचे विचार आणि कृती आपण आपल्या जीवनामध्ये काही प्रमाणात का होईना प्रत्यक्ष अंगीकारली पाहिजे. बाबासाहेबांनी लिहिलेली घटना बाबासाहेबांनी केलेले धर्मांतर या घटनाांनंतर समाजात सध्या जे जे काही घडत आहे त्याविषयी अतिशय  मार्मिक व चिंतनात्मक मुद्दे बैले सर यांनी मांडले.
अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस आर टकले यांनी केला. व्याख्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन माळेगावकर आणि आभार डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मानले. सदरील कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

- **तृतीय पद्म फेस्टिवल सहभाग व पारितोषिक** :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दिनांक 21 ते 23 नोव्हेंबर 2024 मध्ये तृतीय पद्मा फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले होते यानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध लेखन स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील 8 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. वरिष्ठ महाविद्यालय गटातून महाविद्यालयातील कु. वैष्णवी बाबासाहेब दाभाडे या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक तर कु. पायल राजेंद्र बळी या विद्यार्थिनीने दुसरा क्रमांक पटकाविला. आपला या स्पर्धेमध्ये अधिक सहभाग असल्यामुळे तसेच दोन पारितोषिक मिळविल्याबद्दल आपल्या महाविद्यालयाला देखिल पारितोषिक देण्यात आले आहे.सदरील पारितोषिक हे 2019 या वर्षातील पद्मश्री पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ समाजसेवक डॉ. राजेंद्र व डॉ. स्मिता कोल्हे यांच्या हस्ते मिळाला.

- **मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव**

मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सवाचे आयोजन दिनांक 17 ते 19 जानेवारी 2025 या दरम्यान महाविद्यालयात करण्यात आले होते. संगीत महोत्सवाचा स्वतंत्र अहवाल करण्यात आला आहे.

**श्री संत सावता महाराज पुण्यतिथी -दिनांक** – 3 ऑगस्ट 2024





सावता महाराज पुण्यतिथी निमित्त श्री संत सावता महाराज यांचे अध्यात्मिक विचार या विषयावर  प्रा. डॉ. नरसिंग कदम महाराज विचार मांडताना

**दिनांक 1 ऑगस्ट 2024 :- साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे जयंती**




"अण्णाभाऊ साठे:जीवन व कार्य " या विषयावर डॉ. नितीन माळेगावकर विचार मांडताना





दिनांक 14 जानेवारी 2025 रोजी डॉ. राहुल बचाटे “लढा मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा: एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप” या विषयावर मार्गदर्शन करताना






दिनांक 14 एप्रिल 2024 रोजी प्रा. विलास बैले “डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विचारांची प्रासंगिकता” या विषयावर मार्गदर्शन करताना







डॉ. राजेंद्र व डॉ. स्मिता कोल्हे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना कु. वैष्णवी दाभाडे व कु. पायल बळी

.






डॉ. राजेंद्र व डॉ. स्मिता कोल्हे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.**

*** सांस्कृतिक विभाग ***

**अहवाल**

*** केंद्रीय युवक महोत्सव - २०२४-२५ ***

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने दिनांक 25 डिसेंबर ते 28 डिसेंबर 2024 दरम्यान केंद्रीय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय युवक महोत्सवामध्ये श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील 14 कलाप्रकारांमध्ये 13 विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट सादरीकरण केले. सहभागाचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते.

**विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेले १४ कलाप्रकार .**

| |
|---|
| सुगम गायन भारतीय, |
| समूह गायन भारतीय, |
| कोलाज , |
| पोस्टर स्पर्धा, |
| मृदूमूर्ती कला , |
| रांगोळी, |
| चित्रकला |
| काव्यवाचन, |
| प्रश्नमंजुषा, |
| पोवाडा, |
| लोकगीत, |
| लावणी |
| भारुड |
| स्पॉट फोटोग्राफी, |

**. सहभागी 13 विद्यार्थी .**

| अ. क्र | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ग | कलाप्रकार | एकूण कलाप्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | जाधव गौरव गोपीचंद | बी एस्सी प्रथम | भारुड,<br>लोकगीत (सांघिक),<br>भारतीय समूह गायन (सांघिक),<br>भारतीय सुगम गायन (सांघिक),<br>लावणी | 5 |
| 2 | दाभाडे वैष्णवी बाबासाहेब | बी एस्सी तृतीय | भारुड,<br>मृदुमुर्तीकला,<br>चित्रकला,<br>पोस्टर,<br>पोवाडा (सांघिक). | 5 |
| ३ | तावरे पायाल कचरू | बी एस्सी द्वितीय | कोलाज,<br>लोकगीत (सांघिक).<br>भारतीय समूह गायन (सांघिक), | 3 |
| 4 | थोरात दिव्या संतोष | बी ए द्वितीय | लोकगीत (सांघिक).<br>भारतीय समूह गायन (सांघिक), | 2 |
| 5 | राऊत सोनिया सुभाष | बी एस्सी प्रथम | लोकगीत (सांघिक).<br>भारतीय समूह गायन (सांघिक), | 2 |
| 6 | कोलते चंचल भाऊसाहेब | बी एस्सी प्रथम | लोकगीत (सांघिक).<br>भारतीय समूह गायन (सांघिक), | 2 |
| 7 | खुळे साक्षी प्रवीण | बी एस्सी प्रथम | लोकगीत (सांघिक).<br>भारतीय समूह गायन (सांघिक), | 2 |
| 8 | वाघ आदित्य गणेश | बी एस्सी द्वितीय | काव्यवाचन | 1 |
| 9 | पटेल फिरदोस मुजीब | बी ए प्रथम वर्ष | प्रश्न मंजुषा (सांघिक) | 1 |
| 10 | शहा सादिया रफ़िक़ | बी ए प्रथम वर्ष | प्रश्न मंजुषा (सांघिक) | 1 |
| 11 | बनसोडे चंद्रमणी संजय | एम कॉम प्रथम | प्रश्न मंजुषा (सांघिक) | 1 |
| 12 | मिसाळ कोमल राजेंद्र | बी एस्सी द्वितीय | रांगोळी | 1 |
| 13 | सावरकर सतीश गोपाल | बी ए द्वितीय | स्पॉट फोटोग्राफी | 1 |

## क्षणचित्रे .




**कोलाज**

पायल तावरे



**मृदमूर्ती कला**

वैष्णवी दाभाडे




**काव्यवाचन**

आदित्य वाघ



**प्रश्नमंजुषा,**

पटेल फिरदोस, सादिया सहा, चंद्रमणी बनसोडे.




**भारतीय समूह गायन**

जाधव  गौरव गोपीचंद, तावरे पायाल कचरू, थोरात दिव्या संतोष,

राऊत सोनिया सुभाष, कोलते चंचल भाऊसाहेब, खुळे साक्षी प्रवीण




**लोकगीत**

जाधव  गौरव गोपीचंद, तावरे पायाल कचरू, थोरात दिव्या संतोष,

राऊत सोनिया सुभाष, कोलते चंचल भाऊसाहेब, खुळे साक्षी प्रवीण




**पोवाडा,**

वैष्णवी दाभाडे व सहकलाकार




**लावणी**

गौरव जाधव




**भारुड**

गौरव जाधव आणि वैष्णवी दाभाडे व सहकलाकार




**रांगोळी**

कोमल मिसाळ



पोवाडा कलावंत, सहकलाकार, वादक व संघ व्यवस्थापक डॉ. मंजुषा नळगीरकर व डॉ. नितीन माळेगावकर




लावणी कलावंत गौरव जाधव हार्मोनियाम वादक देविदास मालोदे, ढोलकीवादक ऋषिकेश पंडित, लावणी गायिका सरलाताई वाघ व संघ व्यवस्थापक डॉ. मंजुषा नळगीरकर व डॉ. नितीन माळेगावकर

## • वार्षिक स्नेहसंमेलन •

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक 16 ते 18 जानेवारी 2025 दरम्यान पार पडले. दिनांक 17 जानेवारी 2025 रोजी सायंकाळी विविध कला गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या 10 विद्यार्थ्यांनी संगीत रजनी मध्ये 11 इव्हेंट सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी दाभाडे हिने केले.

| अ. क्र | कलाप्रकार | सहभागी मुले |
|---|---|---|
| 1 | गणेश वंदना- एकदंताय वक्रतुण्डाय | गौरव जाधव |
| 2 | गोंधळ- लल्लाटी भंडार | आरती शेजुळ, सविता शेजुळ, पायल तावरे, अरुणा पेहरकर |
| 3 | सुगम गायन- पिंपळाच्या पानावर | दिव्या थोरात |
| 4 | पखवाज वादन | ऋषिकेश पंडित |
| 5 | समूह गायन व लोकगीत - महाराष्ट्र भूमी ही जन्मभूमी, आई तुझ देऊळ साजतय | पायल तावरे, वैष्णवी दाभाडे, दिव्या थोरात, गौरव जाधव |
| 6 | ही झुमके वाली पोरं | राधा मिसाळ, पायल तावरे |
| 7 | भारुड- दादला नको ग बाई | गौरव जाधव, वैष्णवी दाभाडे, पायल तावरे, राधा मिसाळ, दिव्या थोरात, अरुणा पेहरकर |
| 8 | काव्यवाचन- पोलीस भरती | आदित्य वाघ |
| 9 | पोवाडा- बाजीप्रभू देशपांडे | वैष्णवी दाभाडे, पायल तावरे, दिव्या थोरात |
| 10 | गवळण दही दूध लोणी | गौरव जाधव |
| 11 | लावणी चंद्रा | गौरव जाधव |

- **वार्षिक स्नेहसंमेलन (दिनांक 17 जानेवारी 2025)**




गोंधळ- लल्लाटी भंडार- आरती शेजुळ, सविता शेजुळ, पायल तावरे, अरुणा पेहरकर




सुगम गायन- पिंपळाच्या पानावर- दिव्या थोरात




पखवाज वादन - ऋषिकेश पंडित




समूह गायन व लोकगीत - महाराष्ट्र भूमी ही जन्मभूमी, आई तुझ देऊळ साजतय




भारुड- दादला नको ग बाई - गौरव जाधव, वैष्णवी दाभाडे, पायल तावरे, राधा मिसाळ, दिव्या थोरात, अरुणा पेहरकर




काव्यवाचन- पोलीस भरती - आदित्य वाघ




पोवाडा- बाजीप्रभू देशपांडे- वैष्णवी दाभाडे, पायल तावरे, दिव्या थोरात




गवळण- दही दूध लोणी- गौरव जाधव

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# अहवाल

## शैक्षणिक वर्षः- 2024-2025

## मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव

**प्राचार्य**

डॉ. एस. आर .टकले

**विभाग प्रमुख**

प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर

**सहाय्यक**

डॉ. नितीन माळेगावकर




**पं दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था ,संचालित**

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय ,फुलंब्री,शांती प्रतिष्ठान ,किनगाव  व देवगिरी संगीत प्रतिष्ठान, छ. संभाजीनगर,**

**याच्या संयुक्त विद्यमाने**

**मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव**

**अहवाल**

अभिमान संस्कृतीचा महोत्सव फुलंब्रीचाफुलंब्री महोत्सव **2025** : वसा समाजिकतेचा ठसा सांस्कृतिकतेचा तमाम बंधू भगिनींनो सविनय नमस्कार.... भारतीय लोककला जगाच्या नकाशावर आजही दिमाखाने आपली ओळख टिकवून आहे. हे आपल्या सक्षम संस्कृती चे प्रमाण आहे. काळ बदलला तरी आपली परंपरा कायम आहे. सांस्कृतिकता श्वासागणिक जपणे हा गुण या मातीतून रक्तात येणार नाही तर नवलच.... म्हणूनच आपल्या फुलंब्रीत या महोस्त्वाचे आयोजनाचे तिसरे वर्ष दि.१७, १८, १९ जानेवारी २०२५ रोजी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव२०२४ हा साजरा होतोय .फुलंब्री महोत्सव...२०२४. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंती निमित्ताने आमचे श्रद्धास्थान राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे (नाना) यांची संकल्पना व मार्गदर्शनाखाली व सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे येथील मुख्य अभियंता श्री अतुल चव्हाण यांची संकल्पना,व सहकार्य,तथा माननीय आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली यामहोत्सव २०२४ उत्सवाची आयोजना निमित्ताने बैठकीचे आयोजन ४ जानेवारी २०२५ रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालया मध्ये संस्थेचे सचिव मा ,श्री निवृत्ती गावंडे ,मा श्री अतुलदांदा चव्हाण,श्री श्रीकांत उमरिकर ,प्राचार्य डॉ एस आर टकले,श्री योगेश मिसाळ , तथा आयोजन समिती सदस्य मधून फुलब्री गावातील संगीत प्रेमी प्रतिनिधी ,महाविद्यालयाचे माजी विध्यार्थी संघ चे अध्यक्ष श्री अनिल दुतोंडे ,व श्री पुजारी श्री भाउसाहेब राउत आणि महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ मंजुषा नळगीरकर,डॉ नितीन माळेगावकर, समन्वयक डॉ गणेश कुलकर्णी याच्या उपस्थितीत नियोजना संधर्भात बैठक संपन्न झाली.

या बैठकीत मा मा अतुलदादा चव्हाण यांनी मा हरिभाऊ बागडे (नाना) याच्या शी चर्चा करून असे सुचविले किमास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव हा फुलंब्रीच्या शिरपेचात सांस्कृक्तिेचा मानाचा तुरा खोवणारा महोस्तव ठरला आहे . यामुळे या पद्मभूषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सवाचे नामकरण या वर्ष पासून " पद्मभूषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या स्मृतीप्रिथ्यर्थ फुलब्री महोत्सव :२०२४ " नामकरण करून या शिर्षका खाली साजरा करावा असे ठरले .

मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव२०२५ च्या आयोजना मध्ये ,क्रीडा महोस्तव ,भजन ,भारुड ,लोकगीत ,पोवाडा ,भावगीत ,तालवाद्य अशा अनेक महाराष्ट्रच्या लोककला च्या स्पर्धा चे आयोजन करून व्यापक स्वरूपात हा महोत्सव आपण साजरा करणार आहोत . व या साठी फुलब्री महोत्सव समिती स्थापन करावी असे हि ठरले. या समिती मध्ये प्रमुख आधारस्तंभ राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे (नाना) ,अध्यक्ष म्हणुन मा .आ,सौ अनुराधाताई चव्हाण ,असतील कार्यकारी अध्यक्ष म्हणुन श्री योगेश मिसाळ,तर समन्वयक म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस आर टकले व डॉ गणेश कुलकर्णी. प्रमुख मार्गदर्शक म्हणुनफुलब्री शहराचे नगराध्यक्ष हे तथा फुलब्री चे तहसीलदार ,फुलंब्री नगरपंचायत चे मुख्याधिकारी,तथा फुलब्री ग्रामीण चे पोलीस निरीक्षक हे कायम पदसिद्ध समिती सदस्य असतील . व फुलब्री पंचक्रोशीतील ,संगीत प्रेमी ,तथा सर्व राजकीय पक्षाचे प्रतिनिधी,तसेच फुलब्री शहरातील प्रतिष्ठित नागरिकाचा या आयोजन समिती सदस्य म्हणुन समावेश करावा व हा पद्मभूषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या स्मृतीप्रिथ्यर्थ "फुलब्री महोत्सव २०२५ " ला होणारया "फुलब्री महोत्सव चे व्यापक स्वरूपात नियोजन व आयोजन करावे.

असे सर्वानुमते चर्चा अंती ठरले व सर्व सद्स्यानी त्याला अनुमोदन दिले.

## ▪ मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव महोत्सवाचा उद्देश:

मास्तर कृष्णराव फुलंब्रीकरांचे मूळ गाव फुलंब्री हेआहे. त्यामुळे आम्हाला फुलंब्रीकर असल्याचा सार्थ अभिमान आहे आणि म्हणूनच आम्ही फुलंब्री येथील नागरिक आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय शांतीप्रतिष्ठान किनगाव ,तथा देवगिरी संगीत प्रतिष्ठान छ.संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने व श्री संत सावता गुरुकुल, संकुल परिसर फुलंब्री या ठिकाणी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल आणि हा संगीताचा सांस्कृतिक वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहचवियासाठी आणि त्यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा म्हणून या पंचक्रोशीतील नागरिकांना व या भागातील विद्यार्थ्यांना मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या कार्याची माहिती व्हावीहा उद्देश समोर ठेवून

मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव २०२५ च्या आयोजन करण्यात येणार आहे या मधते पुढील आगामी काळात ,क्रीडा महोस्तव ,भजन ,भारुड ,लोकगीत ,पोवाडा ,भावगीत ,तालवाद्य अशा अनेक महाराष्ट्रच्या लोककला च्या स्पर्धा चे आयोजन करून व्यापक स्वरूपात हा महोत्सव आपण साजरा करणार आहोत

या उद्देशाने विविध कार्यक्रमाचे तसेच त्यांच्या गायनाच्या चित्रफिती, रेकॉर्डिंग, त्यांनी विविध चित्रपटांमध्ये भूमिका केलेले चित्रपट तसेच दरवर्षी जानेवारी मध्ये संगीत महोत्सवाचे आयोजन आम्ही सुरू केलेले आहे तसेच आमच्या श्री संत सावता संकुलातील सभागृहास मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांचे नाव दिलेले आहे. व या सभागृहामध्ये मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांचा जीवनपट उलगडावा यासाठी(म्युझियम) त्यांच्याविषयी छायाचित्रे व जीवनपट, व माहितीपट प्रदर्शित करण्याचा आमचा मानस आहे.

## ▪ संगीतकलानिधी पद्मभूषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर यांचा जीवनपट*

सन २० जानेवारी १८९८ रोजी श्री क्षेत्र आळंदी येथे गोरज मुहूर्तावर जन्म.सन १९११ मध्ये नाट्यकला प्रवर्तक संगीत नाटक मंडळीच्या 'संगीत संत सखुबाई' ह्या अत्यंत प्रसिद्ध झालेल्या नाटकामध्ये बालगायक 'नट' म्हणून सादर केलेली विठोबाची भूमिका गाजली. या नाटक मंडळीत असताना सवाई गंधर्व यांचे संगीत मार्गदर्शन लाभले. 'राजा हरिश्चंद्र' नाटकामध्ये 'संत रोहिदास' , 'सौभद्र' नाटकामध्ये 'नारद' अशा बालगायक नटाच्या भूमिका साकारल्या.सन १९११ मध्ये थोर गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले यांच्याकडे रीतसर शास्त्रीय संगीत शिक्षणास प्रारंभ.बखलेबुवांनी स्थापन केलेल्या 'भारत गायन समाज' या संगीत संस्थेतील पहिला विद्यार्थी होण्याचे भाग्य लाभले. पुढे याच संस्थेचे अध्यक्ष म्हणून प्रदीर्घकाळ कारकीर्द तसेच गुरू म्हणून या संस्थेसाठी संगीत गायन विषयक राग संग्रहमाला भाग १ ते ७ हा सरकारमान्य अभ्यासक्रम तयार करून अखेरपर्यंत विद्यादान व गायन सेवेचे मौलिक कार्य केले. सन १९११ मध्ये धुळे येथील कमिन्स क्लबमध्ये वयाच्या तेराव्या वर्षी पहिली जाहीर संगीत मैफल गाजवली.सन १९११ मध्ये पुणे येथील किर्लोस्कर थिएटरमध्ये साहित्यसम्राट न.चिं.केळकर यांचे हस्ते समारंभपूर्वक'सुवर्णपदक' बहाल करण्यात आले व 'मास्टर कृष्णा' अशी उपाधी देण्यात आली.सन १९१५ मध्ये बडोदा येथे गंधर्व नाटक मंडळीच्या 'संगीत शारदा' नाटकात 'शारदा' ही प्रमुख 'स्त्री व्यक्तिरेखा' तरुण वयातील मास्टर कृष्णराव यांनी रंगभूमीवर उत्कृष्टपणे साकारली.

सन १९१६ मध्ये गंधर्व नाटक मंडळीमध्ये गायक नटाची भूमिका करण्यासाठी मा. कृष्णरावांना आमंत्रित करण्यात आले व तसा त्यांच्याबरोबर करार करण्यात आला. तेथील नाटकांमध्ये गायक नटाच्या भूमिका करत असताना नाट्यपदे संगीतबद्ध करण्यास सुरुवात केली.

सन १९३३ पर्यंत 'गायक' , 'नट' व 'संगीतकार' म्हणून या नाट्यसंस्थेत कार्यरत होते. या संस्थेकरिता एकूण सात नाटके संगीतबद्ध केली. त्यातील 'संत कान्होपात्रा' नाटकातील जोहार मायबाप जोहार, अवघाची संसार सुखाचा करीन, धाव घाली विठू आता, अगा वैकुंठीच्या राया अशा नाट्यगीतांच्या अजरामर चाली अजूनही लोकप्रिय आहेत. सन १९२२ मध्ये मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांचे गुरुवर्य पं. भास्करबुवा बखले यांचे निर्वाण झाले. अखिल भारतामध्ये हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा प्रचार व प्रसार करत गुरुवर्य बखलेबुवांची सांगितिक परंपरा त्यांचे शिष्योत्तम मास्टर कृष्णराव यांनी समर्थपणे पुढे चालवली. गंधर्व नाटक मंडळीतील सर्व संगीत विभाग गुरू आणि संगीतकार म्हणून सांभाळण्यास त्यांनी सुरुवात केली.बखले बुवांच्या निर्वाणानंतर बालगंधर्व हे मास्टर कृष्णराव यांना गुरुस्थानी मानू लागले.

सन १९३० मध्ये करवीर व संकेश्वर पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी 'संगीतकलानिधि' ही संगीतकलेतील सर्वोच्च पदवी प्रतिभासंपन्न व बुद्धिमान कलावंत मास्टर कृष्णराव यांना नाशिक येथे समारंभपूर्वक प्रदान केली.

सन १९३४ मध्ये 'धर्मात्मा' चित्रपटाकरिता संगीत दिग्दर्शक म्हणून पुणे येथील प्रभात फिल्म कंपनीत मास्टर कृष्णरावांनी प्रवेश केला.प्रभात फिल्म कंपनीच्या 'गोपालकृष्ण', 'अमरज्योति', 'माणूस', 'शेजारी' अशा चित्रपटांना त्यांनी अप्रतिम संगीत दिले 'लख लख चंदेरी' हे शेजारी चित्रपटातील गीत अजूनही रसिकप्रिय आहे. पुढील काळात इतर चित्रपट संस्थांचे 'कीचकवध', 'ताई तेलीण', 'संत रामदास' असे चित्रपट त्यांनी संगीतबद्ध केले.

सन १९३६ मध्ये बर्लिन ऑलिंपिकमध्ये मा. कृष्णरावांनी स्वकृत चालीत गायलेल्या ' वंदे मातरम्' गीताची रेकॉर्ड स्वातंत्र्यपूर्व भारताचे राष्ट्रगीत म्हणून सर्वप्रथम वाजवली गेली.

सन १९३७ मध्ये २६ ऑक्टोबर रोजी पुण्यामधील टिळक स्मारक मंदिरात सर्वांत पहिला 'वंदे मातरम् दिन' साजरा झाला. त्यावेळी स्वा. सावरकर, सेनापती बापट, श्री. ल. ब. भोपटकर, श्री. ग. वि. केतकर यांच्या उपस्थितीत प्रचंड जनसमुदायासमोर 'झिंझोटी' रागामध्ये स्वरबद्ध केलेल्या 'वंदे मातरम्' गीताचे संपूर्ण कडव्यांसहित गायन केले गीतास कर्णमधुर व सोपी चाल लावल्याबद्दल श्री. भोपटकर यांनी सत्कार केला आणि स्वा. सावरकर यांनी कौतुक केले.

सन १९३८ मध्ये भारत देश गुलामगिरीत असताना 'वंदे मातरम्' हे गीत जाहीरपणे गाण्यास बंदी होती. पण देशभक्त मा. कृष्णराव त्यांच्या संगीत मैफलीचा शेवट कायम 'वंदे मातरम्' गाऊन करायचे. ब्रिटिश राजवटीच्या अधिपत्याखाली असलेल्या रेडिओवर गायन मैफल सादर करताना त्यात त्यांना 'वंदे मातरम्' गाऊ दिलं नाही म्हणून बाणेदारपणे त्यांनी रेडिओवर गाण्यास बहिष्कार टाकला.

सन १९४१ मध्ये ऑगस्ट महिन्यात श्रीमती सरोजिनी नायडू यांचे हस्ते मुंबईतील सेंट झेवीयर कॉलेज हॉल येथे गायन मैफलीनंतर सत्कार व 'गायकांचा नेता' म्हणून गौरव करण्यात आला.

सन १९४२ मध्ये मुंबईच्या गोवालिया टॅंकवर (आताचे ऑगस्ट क्रांती मैदान) ८ ऑगस्ट रोजी भरलेल्या काँग्रेसच्या ऐतिहासिक 'चले जाव' अधिवेशनामध्ये भव्य जनसमुदायासमोर देशभक्त मास्टर कृष्णरावांनी अटकेची पर्वा न करता निर्भीडपणे संपूर्ण 'वंदे मातरम्' गीताचे गायन केले.

सन १९४२ मध्ये नाट्यनिकेतन संस्थेचे 'संगीत कुलवधू' हे नाटक प्रतिभावान मास्टर कृष्णराव यांनी फक्त एका आठवड्यात संगीतबद्ध केले. या संगीत नाटकातील 'बोला अमृत बोला', 'क्षण आला भाग्याचा', 'मनरमणा मधुसूदना' ह्या तिन्ही नाट्यपदांना तर शीघ्रतेने एका दिवसात त्यांनी चाली दिल्या. शास्त्रीय संगीतावर आधारीत परंतु बदललेल्या काळाची पाऊले ओळखून दिलेल्या भावगीत वळणाच्या चाली हे 'कुलवधू' नाटकाच्या नाट्यसंगीतातील सर्वांत मोठं वैशिष्ट्य होते. या नवीन वळणाच्या, दर्जेदार नाट्यसंगीतामुळे मराठी संगीत रंगभूमीवर 'नवयुग' अवतरले. तसेच नाट्यनिकेतन संस्थेच्या कोणे एके काळी, एक होता म्हातारा, भाग्योदय या नाटकांना देखील भावगीत वळणाच्या चाली त्यांनी दिल्या.

**सन १९४४ मध्ये व्ही.शांताराम यांच्या 'राजकमल कलामंदिर' संस्थेचा पहिला मराठी चित्रपट 'भक्तिचा मळा'. या चित्रपटामध्ये 'कर्मयोगी संत सावता माळी' ही प्रमुख भूमिका मास्टर कृष्णरावांनी कोणतीही डमी न वापरता वास्तववादी साकारली तसेच या चित्रपटास संगीत दिले व संत सावता माळी भूमिकेतील गीतांचे आणि अभंगांचे स्वतः गायन देखील केले. या चित्रपटाची 'माली' ही हिंदी आवृत्ती भारतभर प्रदर्शित केली गेली. व्ही. शांताराम यांच्याकडून स्वतंत्र स्वररचना करणाऱ्या मास्टर कृष्णराव यांचे 'ओरिजिनल म्युझिक डायरेक्टर' म्हणून सातत्याने कौतुक व्हायचे.**

मास्टर कृष्णराव यांना संगीत देताना पद्याची वा वाद्याची कधीच आवश्यकता भासली नाही. दिग्दर्शकाने कथानकातील गाणे घालण्याचा नुसता प्रसंग मास्टर कृष्णरावांना कथन केल्यानंतर कृष्णराव तिथल्यातिथे उत्स्फूर्तपणे स्वरांची गुंफण करून गीताची सुरावट निर्माण करायचे. एकाच गाण्यासाठी अशा विविध सुरावटी निर्माण करून अनेक सुरावटींचे पर्याय ते निवडीकरिता त्या दिग्दर्शकासमोर मांडायचे. म्हणजे मास्टर कृष्णराव गाण्याची चाल थेट मस्तकात निर्माण करून मुखावाटे ते स्वर गाऊन सादर करायचे. दिग्दर्शकास कोणती चाल निवडावी असा प्रश्न पडायचा कारण कृष्णरावांच्या सर्वच सुरावटी कर्णमधुर भासायच्या. त्यातून एखादी सुरावट निवडल्यानंतर गीतकार त्यात शब्द तयार करून भरायचा. म्हणजे या संगीतकाराकडून स्वर आधी तयार होत असत आणि मग त्या सुरावटीमध्ये गीतकार शब्द भरत असे. मास्टर कृष्णरावांनी बहुसंख्य चाली याच पद्धतीने दिल्या आहेत. नक्षत्रांचे देणे म्हणतात ते हेच!

भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. हे स्वातंत्र्य दृष्टिपथात असताना सरदार वल्लभभाई पटेल यांनी मध्यस्थी करून मा. कृष्णराव यांना गुढी पाडव्याला मुंबई आकाशवाणी केंद्रावर 'वंदे मातरम्' गाण्यास सन्मानाने आमंत्रित केले. तेव्हा मा. कृष्णराव यांनी आकाशवाणीवर गाण्यास टाकलेला बहिष्कार मागे घेत रेडिओवर 'वंदे मातरम्' चे गायन करून रेडिओवरील सांगीतिक कारकिर्दीस पुनःश्च आरंभ केला

सन १९४७ ते १९५० मध्ये 'वंदे मातरम्' हे स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत व्हावे म्हणून संसदेत त्यांनी ह्या कालावधीत या गीताची वेगवेगळी प्रात्यक्षिके सादर केली. अखेर भारत सरकारतर्फे या गीताला १९५० साली 'भारताचे राष्ट्रीय गीत' म्हणून घोषित करून राष्ट्रगीताइतकाच समान बहुमान देण्यात आला. तत्कालिन सरकारच्या या निर्णयात मास्टर कृष्णराव यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. मास्टर कृष्णराव यांनी जीवनाच्या अखेरपर्यंत वंदे मातरम् गीताचा प्रचार व प्रसार केला.सन १९५३ मध्ये चीन येथे भारत सरकारतर्फे भारतीय कलावंतांच्या सांस्कृतिक शिष्टमंडळाच्या नेतृत्वाकरिता मा. कृष्णराव फुलंब्रीकर यांची निवड करण्यात आली होती. तसेच पेकिंग (आताचे नाव बीजिंग) मध्ये या कलावंतांतर्फे प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना कार्यक्रमाचा आरंभ मा.कृष्णरावांनी संगीतबद्ध केलेल्या 'वंदे मातरम्' गीत गायनाने व्हायचा.सन १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विनंतीवरून भारतात प्रथमच 'बुद्धवंदना' संगीतबद्ध करून त्याचे स्वतःच्या मुख्य आवाजात कोरसच्या साथीत गायन सादर केले. याकरिता पाली भाषेचा अभ्यास करून बुध्दवंदनेतील मंत्रांचा अर्थ आधी जाणून घेतला. या बुद्धवंदनेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ध्वनिमुद्रण करून घेतले. ती संपूर्ण ध्वनिमुद्रिका १४ ऑक्टोबर १९५६ रोजी सम्राट अशोक विजयादशमी या शुभदिनी नागपूरमधील भव्य धर्मांतर सोहळ्यात वाजवली गेली.सन १९५८ मध्ये पुणे येथे नऊ दिवस गायन व वादन मैफलींमधून षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा साजरा झाला होता. त्यात अखिल भारतामधून ६० ते ७० नामवंत कलावंत सहभागी झाले होते.सन १९६५ मध्ये जाहीर केल्यानंतरचे सर्वांत पहिले बालगंधर्व सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले.सन १९६९ मध्ये ५ नोव्हेंबर रोजी सांगली येथे नाट्याचार्य विष्णुदास भावे सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले.

सन १९७१ मध्ये २६ जानेवारी रोजी दिल्ली येथे भारत सरकारतर्फे राष्ट्रपती वराहगिरी वेंकट गिरी यांचे हस्ते पद्मभूषण किताब प्रदान करण्यात आला. मास्टर कृष्णराव यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून अखिल भारतामध्ये सुमारे तीन हजार शास्त्रीय संगीत मैफली झाल्या.'मनमें मोहन बिराजे' यासारख्या अनेक दर्जेदार, नवीन बंदीशी त्यांनी बांधल्या व हिंडोल बहार, मंगल तोडी, बिल्वबिभास असे अनेक जोड राग निर्माण केले. त्यांना 'मैफलीचे बादशाह' म्हणत असत. तसेच मास्टर कृष्णराव यांनी अनेक बंदीशी, नाट्यपदांना भैरवी रागात चाली दिल्या. अनेक भैरवी रागातील बंदीशी ते मैफलीत गात असत त्यामुळे त्यांना 'भैरवी के बादशाह' असे आदराने म्हणत असत. प्रतिभाशक्तीचे वरदान लाभल्यामुळे त्यांच्याकडून शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, चित्रपट संगीत, सुगम संगीत, भक्तिसंगीत, देश संगीत अशा विविध संगीत क्षेत्रांमध्ये सातत्याने दर्जेदार नवनिर्मिती होत राहिली.

सन १९७२ मध्ये संगीत नाटक अकादमीतर्फे फेलोशिप (रत्नसदस्यत्व)चा बहुमान प्राप्त झाला.सन १९७४ मध्ये २० ऑक्टोबरला श्री ललिता पंचमीच्या दिवशी रामप्रहरी निवासस्थानी मास्टर कृष्णराव या अलौकिक कलावंताचा वृद्धापकाळामुळे स्वर्गवास झाला.सन १९७५ मध्ये पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिराच्या आवारात मास्टर कृष्णराव यांचा अर्धाकृती पुतळा स्थापन करण्यात आला. या पुतळयाचे गानहिरा हिराबाई बडोदेकर यांचे हस्ते अनावरण झाले. त्या समारंभात हिराबाई व पु. ल. देशपांडे यांची गौरवपर जाहीर भाषणे झाली.सन १९८३ मध्ये मराठवाड्यातील जालना येथे नव्याने बांधलेल्या नाट्यमंदिरात पुतळा उभारून त्या वास्तूस 'मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर नाट्यगृह' असे नाव दिले.सन १९९७ मध्ये मास्टर कृष्णराव यांचे २० जानेवारी १९९७-९८ हे जन्मशताब्दी वर्ष विविध सांगीतिक कार्यक्रम, भाषणे, लेख, इत्यादी माध्यमांतून महाराष्ट्रात ठिकठिकाणी साजरे केले गेले. जन्मशताब्दी वर्षानिमित्त संगीतकलाविहार आणि साधना साप्ताहिक यांनी मास्टर कृष्णराव विशेषांक प्रसिद्ध केले.सन २०२२ मध्ये मास्टर कृष्णराव यांचे २० जानेवारी २०२२-२३ हे शतकोत्तर रौप्य जयंती वर्ष विविध सांगितीक कार्यक्रमांच्या व पुरस्कारांच्या माध्यमातून साजरे केले गेले.त्यांच्याविषयी आकाशवाणीवर मुलाखती व इतर कार्यक्रम सादर करण्यात आले. विविध वृत्तपत्रे, मासिके व दिवाळी अंकांमधून लेख प्रकाशित करण्यात आले. बिल्वबिभास प्रकाशन संस्थेने 'स्वरयात्री मास्टर कृष्णराव' ही मराठी दिनदर्शिका आणि 'आनंदयात्री मास्टर कृष्णराव' ही स्मरणिका प्रकाशित करून मास्टर कृष्णराव यांना भावपूर्णतेने स्मरणांजली वाहिली याशिवाय, मराठी, इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत अशा चार भाषांमध्ये त्यांचे व्यक्तिमत्त्व, कला व कार्यकर्तृत्व यांच्याविषयी विस्तृत माहिती देणारे www.masterkrishnarao.com हे संकेतस्थळ निर्माण करण्यात आले. तसेच मास्टर कृष्णराव युट्यूब चॅनेल तयार करण्यातआले.




**पं दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था ,संचालित**

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय ,फुलंब्री,शांती प्रतिष्ठान ,किनगाव व देवगिरी संगीत प्रतिष्ठान, छ. संभाजीनगर,**

**याच्या संयुक्त विद्यमाने**

# मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव २०२४

# अहवाल २०२४-२५

शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५, वेळ सायं. ६ वाजता ,उद्घाटन समारंभ मा. आ. सौ. अनुराधाताई चव्हाण (आमदार, फुलंब्री विधान सभा मतदार संघ) ,मा. श्री. देवजीभाई पटेल (उपाध्यक्ष, पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था) , ,स्थानिक कलाकार: विविध कला दर्शन ,गायन अतुल खांडेकर, पुणे (शास्त्रीय गायन व फुलंब्रीकरांची गीते) ,साथ: लिलाधर चक्रदेव (संवादिनी) प्रणव गुरव (तबला)

शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५, वेळ सायं. ६ वाजता नृत्य ,देवमुद्रा नृत्य विद्यालय, व्ही. सौम्याश्री यांच्या शिष्या जाई अभ्यंकर अनुष्का पाटील (भरतनाट्यम)

,गायन

ईश्वर घोरपडे (पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या बंदिशी, नाट्य-भाव-भक्ती गीते) साथ: शांतीभुषण देशपांडे(संवादिनी) पवन सिडाम (तबला) ,पंकज शिरभाते (व्हायोलीन) गोपाळ खोमणे (पखवाज)

रविवार, दि. १९ जानेवारी २०२५, वेळ सायं. ६ वाजता समारोप व सांस्कृतिक कार्यक्रम

प्रमुख उपस्थिती

मा. श्री. हरिभाऊजी बागडे (महामहीम राज्यपाल, राजस्थान)

मा. आ. सौ. अनुराधाताई चव्हाण (आमदार, फुलंब्री विधान सभा मतदार संघ)

मा. श्री अतुलदादा चव्हाण (मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे)

मा. श्री. सुहासभाऊ शिरसाठ (भा.ज.पा. जिल्हाध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर, ग्रामीण)

मा. श्री. निवृत्ती गावंडे(सचिव, पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था)

मा. श्री. योगेश मिसाळ (कार्याध्यक्ष, संगीत महोत्सब संयोजन समिती)

सांस्कृतिक कार्यक्रम

द फोक आख्यान (अस्सल मराठमोळ्या लोककलेचा अभिनव कार्यक्रम, पुणे)

विनित

पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

शांती प्रतिष्ठाण, किनगाव, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

स्थळ : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय (संकुल परिसर)

विवेकानंद नगर, सिल्लोड रोड, फुलंब्री, जि. छ. संभाजीनगर

वेळ सायं. ६.०० वा.




**दिनांक** 17 **जानेवारी** 2025.

**स्थळ श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री (संत सावता संकुल परिसर फुलंब्री )**

**१७ जानेवारी:** 2025.**सायंकाळी ५ ते ७ वाजता:**

**संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह स्थानिक लोककलाकारांचे सादरीकरण.झाले**

**साय :**7 **ते** 7.30

**पद्मभूषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव** 2025 **चे उदघाटन समारंभ हस्ते.प्रमुख माननीय श्री अतुल चव्हाण. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे.माननीय देवजी भाई पटेल{उपाध्यक्ष** , **पंडित दीनदयाळ शिक्षण संस्था ).व फुलंब्री शहराचे प्रथम नागरिक माननीय श्री सुहास भाऊ शिरसाठ. माननीय श्री प्राचार्य प्रदीप जबदे**,**व फुलंब्री महोत्सवाचे कार्याध्यक्ष माननीय श्री योगेश मिसाळ**, **प्राचार्य डॉ. एस आर टकले.बाबासाहेब शिनगारे यांच्या प्रमुख उपस्थितीत उदघाटन समारंभ. संपन्न झाला.**7.30 **ते** 10 **या वेळे मध्ये संगीत महोत्सवात पं. विजय कोपरकरांचे शिष्य ईश्वर घोरपडे हे पं. जितेंद्र अभिषेकींच्या रचनांवर श्री अतुल खांडेकर यांनी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकरांची गीते व शास्त्रीय संगीत सादर केली जाणार आहे**

**संगीत महोसत्व प्रसिद्धी बातमी**



महाराष्ट्र टाइम्स

# फुलंब्री महोत्सव उद्यापासून

## विविध लोककलांचे सादरीकरण

**म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री**

'मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीनिमित्त फुलंब्री महोत्सवाचे आयोजन १७, १८ व १९ जानेवारी रोजी फुलंब्रीतील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय येथे करण्यात आले आहे,' अशी माहिती पत्रकार परीषदेत अतुल चव्हाण यांनी दिली.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि आमदार अनुराधा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था व शांती प्रतिष्ठान यांच्यातर्फे फुलंब्री महोत्सवाचे आयोजन १७ जानेवारी, ते १९ जानेवारी या दरम्यान करण्यात आले आहे.


पत्रकार परिषदेस भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, फुलंब्री महोत्सवाचे कार्याध्यक्ष योगेश मिसाळ, सुमीत प्रधान, गणेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

या महोत्सवाची माहिती देताना अतुल चव्हाण यांनी 'सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेचा आणि लोककलेला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे, प्रेक्षकांसाठी उच्च दर्जाचे सांस्कृतिक अनुभव मिळावेत व फुलंब्रीचे सांस्कृतिक महत्त्व अधिक ठळक व्हावे, यासाठी ही अभिनव संकल्पना राबविण्यात येत आहे,' असे सांगितले. 'या महोत्सवातील विविध कार्यक्रमांचा लाभ फुलंब्री तालुक्यासह जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा,' असे आवाहन आमदार अनुराधा चव्हाण, सुहास शिरसाठ, योगेश मिसाळ व आयोजन समितीच्या सदस्यांनी केले आहे.

### असा असेल महोत्सव

- शुक्रवार, १७ जानेवारी : सायंकाळी पाच ते सायंकाळी सात : संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह स्थानिक लोककलाकारांचे सादरीकरण.
- शनिवार, १८ जानेवारी : सायंकाळी सहा ते रात्री १० : देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या कलाकारांकडून शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन व नाट्यसंगीताचे सादरीकरण
- रविवार, १९ जानेवारी : सायंकाळी सहा ते रात्री १० : मराठवाड्यात पहिल्यांदाच 'द फोल्क आख्यान' हा लोकसंगीताचा कार्यक्रम होणार आहे.

## संगीत महोसत्व कार्यक्रम पत्रिका २०२५











मराठवाडा
स्पेशल थाळी
300






ह.भ.प. जिंद्राज बापु जाधव
स्मृतिप्रवेशद्वार

दिव्य मराठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा 17-01-2025

उत्साह • फुलंब्री महोत्सवाला आजपासून होणार सुरुवात

# डॉ.कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंती महोत्सवाची फुलंब्रीत जय्यत तयारी

प्रतिनिधी | फुलंब्री

फुलंब्री शहरात डॉ. कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त आजपासून तीन दिवसीय फुलंब्री महोत्सवाला सुरुवात होणार आहे. या महोत्सवानिमित्त फुलंब्री शहराला जणू दिवाळीचे स्वरूप आले आहे. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीनिमित्त, राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतुल चव्हाण (मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे) यांच्या संकल्पनेतून व आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली, पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था व शांती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने फुलंब्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

फुलंब्री महोत्सव २०२५ च्या स्वागतासाठी शहरात जय्यत तयारी सुरू असून, १७, १८ व १९जानेवारी रोजी फुलंब्रीत होणाऱ्या या तीन दिवस महोत्सवासाठी संपूर्ण फुलंब्रीकरांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पाहुण्यांच्या स्वागतासाठी शहरातील विविध ठिकाणी भव्य आणि आकर्षक स्वागत कमानी उभारण्यात आल्या आहेत. शहराच्या दुभाजकांवरील बंद असलेल्या स्ट्रीट लाईट्स नव्याने दुरुस्त करून कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या कामांमुळे संपूर्ण शहर दिव्यांनी उजळून निघाले आहे आणि सौंदर्य नव्या उंचीवर पोहोचले आहे. महोत्सवामुळे शहराला दिवाळीचा साज चढल्याची भावना स्थानिक नागरिकांमध्ये दिसून येत आहे.

फुलंब्री महोत्सव हा फक्त एक उत्सव नसून फुलंब्रीकरांच्या एकोप्याचे, सांस्कृतिक वैभवाचे आणि उत्साहाचे प्रतिक ठरणार आहे. या भव्य आयोजनासाठी शहरवासियांसह विविध क्षेत्रातील मान्यवरही आपला सक्रिय सहभाग नोंदवत आहेत.

**जी-२० सोहळ्याची आठवण, शहर झाले झगमगित**

छत्रपती संभाजीनगरमध्ये जी-२० परिषदेच्या निमित्ताने जसे शहराचा चेहरामोहरा बदलला, तसेच फुलंब्री महोत्सवासाठीही शहराच्या सौंदर्यात भर घालण्याचे काम मोठ्या उत्साहाने सुरू आहे. महोत्सवाच्या आयोजनात स्थानिक प्रशासन, व्यापारी वर्ग, सामाजिक संघटना आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर योगदान देत आहेत. महोत्सवाच्या तीन दिवसांत विविध सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, ज्यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांसाठी मनोरंजनाची पर्वणी असणार आहे.

दैनिक आनंद नगरी
सकारात्मक विचारांचे
जालना, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, नांदेड येथून एकाच वेळी एकसमयाने प्रकाशित होणारे मराठी दैनिक
Friday 2025/01/17

# पद्मभूषण मास्तर कृष्णाराव फुलंब्रीकर याच्या जयंती निमित्त तीन दिवसीय फुलंब्री महोत्सवाचे आयोजन



फुलंब्री (प्रतिनिधी) -दि.२० जानेवारी हा पद्मभूषण मास्तर कृष्णाराव फुलंब्रीकर याच्या जयंती निमित्त तीन दिवसीय फुलंब्री महोत्सव साजरा करण्यात येणार आहे, यातून स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन मिळेल तर पुणे मुंबई नंतर मराठवाड्यात प्रथमच द.फोक आख्यान संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, या कार्यक्रमाचा शुभारंभ राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते होणार आहे, अध्यक्षस्थानी आमदार अनुराधा चव्हाण ह्या राहतील असे साबाविचे (पुणे) मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी पत्रकारांना माहिती दिली. आशा या संगीतमय कार्यक्रमाचे तीसरे वर्ष आहे दि.१७, १८ व १९ जानेवारी असे तीन दिवस या महोत्सवात भरगच्च कार्यक्रम आहेत, अतुल चव्हाण यांच्या संपकल्पनेतुन हा महोत्सव होत आहे. पंडित दिनदयाल उपाध्यक्ष शिक्षण संस्था व शांती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यामाने हा तीन दिवसीय मोहत्सव येथील सावता महाविद्यालय प्रांगणात होत आहे. सामाजिक सांस्कृतिक व लोक कलेला प्रोत्साहन व व्यासपीठ मिळावे हे या महोत्सवाचे उदिष्ट आहे यातून मास्तर कृष्णाराव फुलंब्रीकर याची ओळख सर्वत्र होऊन या भुमिपुत्राचा सर्वत्र आदर होईल. दि.१७ रोजी सायंकाळी ५ ते ७ सावता महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह स्थानिक ग्रामीण लोक कलाकाराचे सादरीकरण दि.१८ सायं ६ ते १० शास्त्रीय नुत्य शास्त्रीय गायन व नाट्य संगीताचे सादरीकरण हे देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या कलाकाराडुन सादर होणार आहे दि.१९ सायंकाळी ६ ते १० या वेळेत मुंबई - पुण्या नंतर मराठवाड्यात प्रथमच द फोक आख्यान हा लोकसंगीताचा कार्यक्रम होईल आशा सर्व कार्यक्रमांना सर्व स्तरातून उपस्थित राहवे असे आवाहन आ.अनुराधा चव्हाण, सुहास शिरसाठ, योगेश मिसाळ व आयोजक समिती केली आहे अशी माहिती अतुल चव्हाण यांनी सांगितले यावेळी गणेश कुलकर्णी, सुहास शिरसाठ, योगेश मिसाळ यांची उपस्थित होते.




## नियोजन समिती सदस्य



**फुलंब्री येथे पद्मभुषण कृष्णराव फुलंब्रीकर**
**स्मृती प्रित्यर्थ**
**फुलंब्री संगीत महोत्सव***2025
**दिनांक** 17 **जानेवारी** 2025. **: उद्घाटन समारंभ**

**स्थळ श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री (संत सावता संकुल परिसर फुलंब्री )पद्मभूषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव** 2025 **चे उद्घाटन समारंभ हस्ते प्रमुख माननीय श्री अतुल चव्हाण. मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे.माननीय देवजी भाई पटेल .उपाध्यक्ष , पंडित दीनदयाळशिक्षण संस्था ).व फुलंब्री शहराचे प्रथम नागरिक माननीय श्री सुहास भाऊ शिरसाठ. माननीय श्री प्राचार्य प्रदीप जबदे,व फुलंब्री महोत्सवाचे कार्याध्यक्ष माननीय श्री योगेश मिसाळ, प्राचार्य डॉ.एस आर टकले.बाबासाहेब शिनगारेयांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन समारंभ. संपन्न झाला.**










पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
स्मृतिप्रीत्यर्थ
फुलंब्री महोत्सव २०२५


पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
स्मृतिप्रीत्यर्थ
फुलंब्री महोत्सव २०२५


पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
फुलंब्री महोत्सव


पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
फुलंब्री महोत्सव






फुलंब्री महोत्सव २०२५


पद्मभुषण कृष्णराव फुलंब्रीकर
फुलंब्री महोत्सव २०२५

फुलंब्री येथे पद्मभुषण कृष्णराव फुलंब्रीकर
स्मृती प्रित्यर्थ
फुलंब्री संगीत महोत्सव*2025
दिनांक 17 जानेवारी 2025.

**पं. विजय कोपरकरांचे शिष्य ईश्वर घोरपडे हे पं. जितेंद्र अभिषेकींच्या रचनांवर श्री अतुल खांडेकर यांनी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकरांची गीते व शास्त्रीय संगीत सादर केले.**
**फुलंब्री महोत्सवास फुलंब्री परिसरातील संगीत प्रेमी व शाळा महाविद्यालय मधील विद्यार्थी विद्यार्थिनीउपस्थित**







Link : https://www.facebook.com/100002067379759/videos/1922154148548121/
https://www.facebook.com/100002067379759/videos/567516712781576/
https://www.facebook.com/100002067379759/videos/1325477828635087/

फुलंब्री येथे पद्मभुषण कृष्णराव फुलंब्रीकर

**स्मृती प्रित्यर्थ**

**फुलंब्री संगीत महोत्सव***2025

**दिनांक** 18 **जानेवारी** 2025.

**स्थळ श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री (संत सावता संकुल परिसर फुलंब्री )**

**श्री ईश्वर घोरपडे...यांनी कृष्णराव फुलंब्रीकर महोत्सवात कलाकारांनी समरसून मास्तरांच्या बंदिशी नाट्यगीते भाक्तीगीते सादर साथसंगत**,**पवन सिडाम (तबला) ओंकार लोहार**, **ईश्वर घोरपडे**, **श्रीनिवास केंचे**, **शांतीभुषण देशपांडे (संवादिनी)**, **पंकज शिरभाते (व्हायोलीन)**.







Video Link:
https://www.facebook.com/100002067379759/videos/1115723473108903/
https://www.facebook.com/100002067379759/videos/1129594982205199/
https://www.facebook.com/100002067379759/videos/1269476997665458/
https://www.facebook.com/100002067379759/videos/3842082936004462/
https://www.facebook.com/100002067379759/videos/1129594982205199/
https://www.facebook.com/100002067379759/videos/1269476997665458/.

**फुलंब्री येथे पद्मभुषण कृष्णराव फुलंब्रीकर**

**स्मृती प्रित्यर्थ**

**फुलंब्री संगीत महोत्सव***2025

**दिनांक** 18 **जानेवारी** 2025.

**स्थळ श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री (संत सावता संकुल परिसर फुलंब्री )**

**श्री ईश्वर घोरपडे..यांचे आणी सहकलाकारांचे स्वागत मा श्री. अतुलजी चव्हाण,, मा निवृत्ती गावंडे सर.**

**श्री ईश्वर घोरपडे..यांनी**

**कृष्णराव फुलंब्रीकर महोत्सवात कलाकारांनी समरसून मास्तरांच्या बंदिशी नाट्यगीते भाक्तीगीते सादर केली. महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी पं.विजय कोपरकरांचे शिष्य ईश्वर घोरपडे यांनी रसदारपणे सादरीकरण केले त्यांना साथसंगत पवन सिडाम (तबला) ओंकार लोहार, ईश्वर घोरपडे, श्रीनिवास केंचे, शांतीभुषण देशपांडे (संवादिनी), पंकज शिरभाते (व्हायोलीन) यांनी केली.**






पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
स्मृतिप्रीत्यर्थ
फुलंब्री महोत्सव २०२५


पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
स्मृतिप्रीत्यर्थ


पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
स्मृतिप्रीत्यर्थ
फुलंब्री महोत्सव २०२५


पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर
फुलंब्री महोत्सव २०२५





# फुलंब्री येथे पद्मभुषण कृष्णराव फुलंब्रीकर
# स्मृती प्रित्यर्थ
# फुलंब्री संगीत महोत्सव*2025

**दिनांक 18 जानेवारी 2025 (Ist Session)**

**देखण्या भरतनाट्यमने दुसऱ्या दिवशीची सुरवात...**

**नृत्यगुरू व्हि सौम्याश्री यांच्या शिष्या जिया अभ्यंकर व अनुष्का पाटील यांनी पुष्पांजली अर्पण करून आपल्या नृत्याला प्रारंभ केला.**










Link: https://www.facebook.com/100002067379759/videos/1677763253117358/
https://www.facebook.com/100002067379759/videos/1823017911871260/
https://www.facebook.com/100002067379759/videos/1677763253117358/




**मराठवाड्यात प्रथमच फुलंब्री शहरात** The Folk **आख्यान थाट ह्यो जुना खेळ हा नवा (उत्सव मराठी लोककलेचा) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.दि.** 19 **जानेवारी** 2025**वेळ. सायं** 6.00 **स्थळ. श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर**

**प्रमुख उपस्थिती: आधारस्तंभ, आदरणीय मा.श्री. हरिभाऊजी बागडे नाना ( महामहीम राज्यपाल राजस्थान)याच्या हस्ते पद्मभूषण कृष्णराव फुलंब्रीकर फुलंब्री महोत्सव** 2025 **चा समारोप संपन्न होणार आहे त या कार्यक्रमाच्या नियोजनाची पाहणी करण्यासाठी मार्गदर्शक व ज्यांच्या ,संकल्पने मधून हा भव्य कार्यक्रम आयोजित केला आहे असे माननीय श्री मा.श्री.अतुल काका चव्हाण ( मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे) यांनी काल नियोजनाच्या संदर्भातील पाहणी करण्यासाठी भेट दिली**

**व मार्गदर्शन केले. मा श्री.निवृत्ती गावंडे सर प्राचार्य डॉ एस आर टकले योगेश मिसाळ श्री आप्पासाहेब चव्हाण. उपस्थित होते**






फुलंब्री महोत्सव २०२५
सांस्कृतिक कार्यक्रम
"द फोक आख्यान" (अस्सल मराठमोळ्या लोककलेचा अभिनव कार्यक्रम, पुणे)
प्रमुख उपस्थिती
मा.श्री.हरिभाऊजी बागडे (नाना)
मा.आ.सौ.अनुराधाताई चव्हाण
मा.श्री.अतुलजी चव्हाण
मा.श्री.सुहासजी शिरसाठ
मा.श्री.निवृत्ती गावंडे
मा.श्री.योगेश मिसाळ
सदस्य,फुलंब्री महोत्सव आयोजन समिती
सौ.अनुराधाताई अतुल चव्हाण






















सांस्कृतिक कार्यक्रम
फुलंब्री महोत्सव २०२५











